अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक या कार्यालयांतर्गत वैज्ञानिक संशोधन अधिकारी हे पद वर्ग करण्याबाबत-

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्रमांक: आढावा-२०१८/प्र.क्र.४०/२०१८/आस्था.(पुनर्रचना)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ३० जुलै, २०१९

<u>वाचा</u>:- १. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. १०९२/सीआर-८०६/व्यय-६, दि. १५.१०.१९९२
२. शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. आढावा-१००२/३३५/२००२/आ.(प्रशि), दि. ०६.०२.२००३
३. शासन निर्णय, जलसंपदा विभाग, क्र. आढावा-२०१८/प्र.क्र.४०/२०१८/आ(पुनर्रचना), दि. ०५.०१.२०१९

<u>प्रस्तावना</u>:-

मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान अधिनस्त अधीक्षक अभियंता, आधार सामग्री पृथ:करण मंडळ, नाशिक यांच्या अधिपत्याखालील माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) कक्ष, नाशिक या विभागीय कार्यालयांतर्गत पुरेसा कार्यभार नसल्याने सदर कार्यालय संदर्भ क्र.३ च्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आले आहे. सदर कार्यालयात मंजूर पदांवरील कार्यरत असणाऱ्या ५ कर्मचाऱ्यांपैकी ४ कर्मचाऱ्यांचे समावेशन परिमंडळ व मंडळ कार्यालयांतर्गत करण्यात आले आहे. सदर कार्यालयातील वैज्ञानिक संशोधन अधिकारी हे पद फिरवाफिरवीने अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक यांच्याकडे वर्ग करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u>:-

मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान अधिनस्त अधीक्षक अभियंता, आधार सामग्री पृथ:करण मंडळ, नाशिक यांच्या अधिपत्याखालील माहिती व्यवस्थापन प्रणाली (MIS) कक्ष, नाशिक हे विभागीय कार्यालय संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये बंद करण्यात आले असल्याने सदर कार्यालयातील वैज्ञानिक संशोधन अधिकारी हे पद अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक या कार्यालयाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर पदाकडे सोपविण्यात आलेल्या राज्य विशेष कृती आराखडा (State Specific Action Plan-SSAP) या विषयाचे कामकाज यापुढे अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक यांच्या अधिपत्याखाली करण्यात येईल. तसेच त्याबाबतचे सर्व

कार्यालयीन अभिलेख मेरी, नाशिक कार्यालयांतर्गत हस्तांतरीत करण्याची कार्यवाही संबंधित कार्यालयाने तात्काळ करावी.

२. शासन निर्णय, वित्त विभाग, क्र.१०९२/सीआर-८०६/व्यय-६, दि.१५.१०.१९९२ मधील तरतुदींनुसार विभागास प्रदान केलेल्या प्राधिकारानुसार हा आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

३. वैज्ञानिक संशोधन अधिकारी या पदाचे वेतन अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक या कार्यालयास मंजूर असलेल्या लेखाशीर्षाखाली अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१९०७३०१७१६४०५६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Gangaram Gangarkar

Digitally signed by Sunil Gangaram Gangarkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b2512fdfec4104829bc2f439e33adb2e3f823a285cfade8149e690564bc13f6, cn=Sunil Gangaram Gangarkar
Date: 2019.07.30 17:26:00 +05'30'

(सु. गं. गांगरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव.
४) मा. मंत्री (खारभूमी) यांचे खाजगी सचिव.
५) मा.राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक.
६) मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा.
७) मा.विधानपरिषद / विधानसभा सदस्य (सर्व).
८) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
९) प्रधान सचिव (ज.सं.प्र. व विकास), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) सचिव (ज.सं.व्य. व लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) सचिव (प्रकल्प समन्वय), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/ नागपूर.
१३) महालेखापाल १ व २, महाराष्ट्र राज्य (लेखापरीक्षा) मुंबई/ नागपूर.
१४) संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१५) महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.
१६) सर्व कार्यकारी संचालक, महामंडळ कार्यालये.

१७) सर्व मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
१८) सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग.
१९) मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक.
२०) सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग.
२१) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था (मेरी), नाशिक.
२२) उप सचिव (सेवा)/उप सचिव (प्रशा.)/उप सचिव (आस्था.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
२३) आंतरवित्तीय सल्लागार व उप सचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
२४) अधीक्षक अभियंता, ई- प्रशासन मंडळ, जलसंपदा विभाग, पुणे (मंडळ कार्यालयांतर्गत झालेल्या बदलाची आवश्यक नोंद घेण्यास्तव अग्रेषित.)
२५) सर्व कार्यासने, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.
२६) कार्यासन आस्थापना (पुनर्रचना) संग्रहार्थ.